# ग्राहक गाऱ्हणे निवारण मंच

(विद्युत कायदा ,२००३ अंतर्गत कलम ४२ (५) अन्वये स्थापित )

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**

**जळगाव परिमंडळ**


**दुरध्वनी क्र ०२५७ – २२७३००४**
**Email :-cgrfjalgaonzone@gmail.com**
cejalgaon@mahadiscom.in.
cgrfjalgaon@mahadiscom.in

**ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच**
**जुनी एम.आय.डी.सी.**
**महावितरण विश्राम गृहाजवळ,**
**अजिंठा चौफुली जळगाव. ४२५००३**


जा.क्रः स.स./ग्रागानिमं/जप/जळगाव मं/०६–२०१८–१९/ N 0 0 0 4 1 दिनांकः 18 SEP 2018

**(रजिष्टर पोच व्दारे)**

**गाऱ्हाणे दाखल दिनांक : २०/०६/२०१८**
**निकाल दिनांक : १५/०९/२०१८**

प्रति,

१. मे.खान्देश पेपर मिल्स प्रा.लि.
के-५,एम. आय.डी.सी.एरिया,
जळगाव ता.जि.जळगाव. पिन-४२५००३
(ग्रा.क्र.११००१००३४६६३)
} तक्रारदार

२. नोडल अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
म रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.
मंडळ कार्यालय जळगाव

३. कार्यकारी अभियंता
म रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.
विभागिय कार्यालय, जळगाव.
} विज वितरण कंपनी

(शिक्का: सदस्य सचिव तथा कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं. मर्या., जळगांव, ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच)

---

## निर्णयपत्र

खान्देश पेपर मिल्स प्रा.लि. के-५, एम.आय.डी.सी जळगाव. ता.जि. जळगाव. हे विज वितरण कंपनीचे औद्योगिक (LT) प्रवर्गातील ग्राहक आहेत. महावितरण कंपनीकडुन सुरक्षा ठेव परतावा मिळणेबाबत योग्य ते आदेश पारीत करावेत व इतर अनुषंगिक न्यायोचित आदेश होण्याबाबत योग्य ती कार्यवाही होवुन सुरक्षा ठेव परत मिळण्याविषयी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षाकडे तक्रार दाखल केली. मात्र अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्षाकडुन वेळेत निकाल न दिल्यामुळे ग्राहकाने आपले गाऱ्हाणे अनुसुची "अ" मध्ये मंचाकडे सादर केले. ते मंचाकडे दि २०.०६.२०१८ रोजी नोंदविण्यात आले.

त्यानुसार मंचाचे अध्यक्ष ,सदस्य-सचिव व सदस्य यांनी आपसात सल्लामसलत करुन हे प्रकरण सुणावणीस घेण्याचा निर्णय घेण्यात आला. सदर गाऱ्हाण्याची सुणावनी दि.२७.०७.२०१८ रोजी नियोजित करण्यात आली. या संबंधीची सुचना तक्रारदार ग्राहक व वितरण कंपनीच्या संबंधीत अधिकाऱ्यांना दि. १८.०६.२०१८ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आली. याच पत्रासोबत तक्रार अर्जाची प्रत नोडल अधिकारी तथा कार्यकारी अभियंता मंडळ कार्यालय जळगाव व कार्यकारी अभियंता विभागिय कार्यालय जळगाव यांना देवुन तक्रार अर्जानुसार मुद्देनिहाय अभिप्राय १५ दिवसाच्या आत मंचाकडे सादर करण्याबाबत व त्याची प्रत ग्राहकाला पोचविण्याबाबत सुचित करण्यात आले.

सुनावणीस विद्युत वितरण कंपनीच्या जळगाव मंड्ळ कार्यालयाकडुन प्रभारी कार्यकारी अभियंता श्री आर.एफ.पवार, तसेच जळगाव विभाग कार्यालयाकडुन कार्यकारी अभियंता श्री संजय तडवी, हे उपस्थित होते. तर ग्राहक प्रतिनिधी श्री विकास मेन्दळकर हे अनुपस्थित होते, परंतु त्यांनी त्यांची बाजु ही दि.२५.०७.२०१८ रोजीच्या ई-मेल द्वारे कळविलेली होती व सदर मेल द्वारे दिलेल्या पत्रातील मजकुर हा सुनावणी दरम्यान ग्राहक प्रतिनीधीची बाजु म्हणुन ग्राह्य धरण्यात यावा असे कळविले होते. त्यानुसार सुनावणीस सुरुवात करण्यात आली.




Scanned by CamScanner

**ग्राहकाची बाजु :-**

Our client **M/s. Khandesh Paper Mills Pvt. Ltd. K-5, MIDC Area, Jalgaon 425003 Consumer No. 110010034663 (LT).** Is Low Tension consumer. Vide our letter dated 19th September 2016 (Copy enclosed herewith), request was made to the office of Dy. Executive Engineer Urban Sub-Division No. 1 for refund of Security Deposit amounting to Rs. 90,800/- ( Rs. Ninety Thousand Eight hundred only ) as our supply was permanently disconnected on our request for Permanent Disconnection.

Though we had made the request more than year before and till date we have not received the refund for our Security deposit amount of Rs. 90,800/-, we filed an appeal with IGRC cell, Jalgaon Circle, MSEDCL Jalgaon with following request....

1. Appropriate authority may please be directed to refund the Security deposit amount of Rs. 90,800/- ( Rs. Ninety Thousand Eight hundred only ) immediately.
2. As we have not been received the interest on our Security Deposit amount of Rs. 90,800/- for the Financial year 14-15, Financial year 15-16, Financial year 16-17 and Financial year 17-18 the same may please be given to us.
3. For delay in refund of SD amount in-spite of our long pending request, penalty as per MERC SOP regulation may please be imposed on concerned authority.

We had filed an appeal with IGRC cell, Jalgaon Circle, MSEDCL Jalgaon vide our letter dated 16th Feb 2018 which was acknowledged as received on dated 16th Feb 2018 by MSEDCL Jalgaon Circle office.

Though more than two months period is over, Not any order passed by IGRC cell, Jalgaon Circle office, MSEDCL Jalgaon.

**ग्राहकाच्या मागण्या :-**

**Hence we request your kind authority to issue a direction to the concerned authority to Refund Security Deposit amount along-with upto date interest. and consider our request / submission as below.**

1. Appropriate authority may please be directed to refund the Security deposit amount of Rs. 90,800/- ( Rs. Ninety Thousand Eight hundred only ) immediately.
2. As we have not been received the interest on our Security Deposit amount of Rs. 90,800/- for the Financial year 14-15, Financial year 15-16, Financial year 16-17 and Financial year 17-18 the same may please be given to us as per the interest rate circular issued by MSEDCL from time to time.
3. For delay in refund of SD amount in-spite of our long pending request, penalty as per MERC SOP regulation may please be imposed on concerned authority.

**ग्राहक प्रतिनिधी श्री विकास मेन्दळकर हे अनुपस्थित होते. परंतु त्यांनी त्यांची बाजु ही दि.२५.०७.२०१८ रोजीच्या ई-मेल द्वारे कळविलेली होती. ती खालील प्रमाणे :-**

I Vikas Maindalkar – Consumer Representative due to some personal reason may not attend the hearing. Hence request your kind authority to consider our written submission as we made earlier and our reply to MSEDCL reply as below....

*On going through the reply submitted by MSEDCL it is seen that due to some deficiencies the case for refund of Security deposit could not be finalised.*

*The deficiencies pointed out in the MSEDCL letter are all pertains to the action needs to be taken by the MSEDCL and not the consumer. So, for such delay consumer should not be suffered.*

*Our request for refund of Security deposit was first made on 19th September 2016. In-spite of lapse of more than 20 months, we have not yet get refund for SD due to some deficiencies of MSEDCL.*

*Even as per reply, the case is not finalised. It is mentioned that for approval the case is being send to MSEDCL Head Office.*



Scanned by CamScanner

*As per condition of supply clause No. 11.5 on request for refund of Security Deposit, this should be refunded within the period of 30 days from the receipt of such request.*

*In our case though more than 20 month period is over and we have not yet received the Refund.* ***Though MSEDCL have agreed that this amount is refundable to consumer, they have not confirmed when they are going to refund this SD amount.***

*Under the circumstances it is our humble request to Hon. CGRF as follow.....*

*A. MSEDCL authority may please be directed to refund the Security deposit amount of Rs. 90,800/- ( Rs. Ninety Thousand Eight hundred only )"* ***immediately by stipulating the time"*** *within which such refund to be made.*

*B. As we have not been received the interest on our Security Deposit amount of Rs. 90,800/- for the Financial year 14-15, Financial year 15-16, Financial year 16-17 and Financial year 17-18 and for Financial year, the same may please be given to us.*

*C. For delay in refund of SD amount, penalty as per MERC SOP regulation may please be imposed on concerned authority.*

We request your kind authority to consider our above submission and pass the suitable order in this matter.

**वितरण कंपनीची बाजु :-**

वितरण कंपनीचे संबंधीत विभागाचे कार्यकारी अभियंता, विभागीय कार्यालय जळगाव यांनी त्यांचे पत्र क्र.२६२५ दि.०५.०७.२०१८ अन्वये पत्रव्यवहार मंचापुढे सादर केला त्यात त्यांनी त्यांची बाजु खालील प्रमाणे मांडलेली आहे.
ग्राहक नामे मे.खान्देश पेपर मिल्स प्रा.लि.(ग्राहक क्र.११००१००३४६६३) यांनी संदर्भ क्र.१ नुसार अति.कार्यकारी अभियंता जळगाव शर उपविभाग -१ यांचेकडे अर्ज सादर केला होता. त्यानुसार संदर्भ क्र.२ नुसार सदर ग्राहकाचा सुरक्षा ठेव परतावा मिळणेबाबतचा प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झाला. प्रस्तावाची तपासणी केल्यानंतर प्रस्तावातील त्रुटी असल्याने प्रस्ताव या कार्यालयाकडुन त्रुटींची पुर्तता पुर्ण करुन मिळणेकामी संदर्भ क्र.३ नुसार परत करण्यात आला.प्रस्तावात असलेल्या त्रुटी पुढीलप्रमाणे :-
अ). प्रस्तावासोबत जोडलेल्या संदर्भ क्र.३ च्या पि.डी. रिपोर्ट मध्ये ग्राहकाचे पि.डी. फ़ायनल रिडींग दर्शविलेले नव्हते. त्याची पुर्तता संदर्भ क्र.७ नुसार करुन देण्यात आली. परंतु त्यात खाडाखोड आहे. तसेच पि.डी. रिपोर्ट कंपनी नियमानुसार असलेल्या प्रपत्र नमुन्यातील नाही.
ब). प्रस्तावासोबत सि.पी.एल तसेच एल.टी. आर-२८ रिपोर्ट जोडलेले नव्हते- त्याची पुर्तता संदर्भ क्र.९ नुसार करण्यात आलेली आहे.
वरीलप्रमाणे दिलेल्या त्रुटींची पुर्तता वरील संदर्भ क्र.९ च्या पत्रानुसार करण्यात आलेली असुन सदर पत्र या कार्यालयास आज दि.०५.०७.२०१८ रोजी प्राप्त झाले असुन सदर ग्राहकाचा सुरक्षा ठेव परतावा मिळणेबाबतचा प्रस्ताव (मुळ रक्कम व त्यावरील व्याजासह) या कार्यालयाकडुन तातडीने (जळगाव मंड्ळ कार्यालयामार्फ़त ) मुख्य कार्यालय, मुंबई येथे सादर करण्यात येणार आहे.

**तसेच कार्यकारी अभियंता जळगाव यांनी त्यांचे पत्र क्र.४००८ दि.१०.०८.२०१८ नुसार कळविलेला खुलासा खालील प्रमाणे :-**

ग्राहक नामे मे.खान्देश पेपर मिल्स प्रा.लि.(ग्राहक क्र.११००१००३४६६३) यांनी संदर्भ क्र.१ नुसार सुरक्षा ठेव परतावा मिळणेबाबतचा अर्ज अति.कार्यकारी अभियंता जळगाव शर उपविभाग -१ यांचेकडे सादर केला होता. त्यानुसार संदर्भ क्र.२ नुसार उपविभागाकडुन सदर ग्राहकाचा सुरक्षा ठेव परतावा मिळणेबाबतचा प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झाला. प्रस्तावाची तपासणी केल्यानंतर प्रस्तावात त्रुटी असल्याने प्रस्ताव या कार्यालयाकडुन त्रुटींची पुर्तता पुर्ण करुन मिळणेकामी संदर्भ क्र.३ नुसार परत करण्यात आला. संदर्भ क्र.४ नुसार त्रुटींची पुर्तता करण्यात आली असुन सदर ग्राहकाचा सुरक्षा ठेव परतावा मिळणेबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र.५ नुसार मुख्य अभियंता (वाणिज्य), मुख्य कार्यालय , बांद्रा (पुर्व), मुंबई यांच्याकडे पाठविण्यात आलेला आहे.

मुख्य कार्यालयाकडुन मंजुरी मिळताच ग्राहकास सुरक्षा ठेव रकमेचा व्याजासह परतावा (एल.टी.आर-२८ रिपोर्टनुसार) नियमानुसार त्वरीत करण्यात येईल.

**अंतर्गत तक्रार निवारण कक्षाची कार्यवाही :-**

अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, मंड्ळ कार्यालय, जळगाव अंतर्गत दि. ०३.०५.२०१८ रोजी सुनावणी घेण्यात आली परंतु त्यावर कुठलाही निकाल/ निर्णय अद्यापपावेतो त्यांनी दिलेला नाही असे ग्राहक प्रतिनिधी यांनी नमुद केले होते परंतु प्रत्यक्षात अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, मंड्ळ कार्यालय, जळगाव यांनी दि.२२.०५.२०१८ रोजी निर्णय घेवुन पत्र क्र.३३१४ दि.०२.०६.२०१८ अन्वये खालील निकाल देण्यात आलेला आहे.

१. *महावितरण कंपनीने ग्राहकास त्वरीत अनामत रक्कम परत करावी.*
२. *केलेल्या कार्यवाहीचा अहवाल कक्षास त्वरीत सादर करावा.*
३. *सदर ची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.*



Scanned by CamScanner

**मंचाचे निष्कर्ष :-**

ग्राहक प्रतिनीधी यांचा दि.२५.०७.२०१८ रोजीच्या ई-मेल द्वारे दिलेल्या पत्रातील मजकुर ग्राह्य धरुन व त्यानुसार कंपनी प्रतिनिधीचे म्हणणे ऐकुन घेवुन तक्रारदाची तक्रार, दाखल कागदपत्रे विजवितरण कंपनीचे म्हणने व कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की,

१. मे.खान्देश पेपर मिल्स प्रा.लि.(ग्राहक क्र.११००१००३४६६३) यांनी संदर्भ क्र.१ नुसार दि. १९.०९.२०१६ रोजी सुरक्षा ठेव परतावा बाबत अति.कार्यकारी अभियंता जळगाव शहर उपविभाग -१ यांचेकडे अर्ज सादर केला होता.
२. सदर अर्ज हा अद्याप पावेतो महावितरण्च्या अंतर्गत त्रुटीं व पत्रव्यवहारामध्ये सुमारे १० महिन्यांपर्यंत प्रलंबित असल्याचे निदर्शनास दिसुन येते.
३. तसेच मे.खान्देश पेपर मिल्स प्रा.लि.यांचे वित्त वर्ष २०१४-१५, २०१५-१६, २०१६-१७ व २०१७-१८ या कालावधी मध्ये सुरक्षा ठेवीवरील व्याज न देणेबाबत महावितरणचे प्रतिनीधी कोणताही खुलासा केलेला नाही.

वरील सर्व बाबींचा सारासार विचार करुन मंच खालील आदेश देत आहे.

**निर्णय**

१. मे.खान्देश पेपर मिल्स प्रा.लि. ग्राहक क्र. ११००१००३४६६३ यांना सुरक्षा ठेव व त्यावरील परतावा दिनांका पर्यंत व्याज त्वरीत अदा करण्यात यावे.
२. मे.खान्देश पेपर मिल्स प्रा.लि.यांचे वित्त वर्ष २०१४-१५, २०१५-१६, २०१६-१७ व २०१७-१८ या कालावधी मध्ये सुरक्षा ठेवीवरील व्याज अदा केलेले नसल्यास ते देखील त्वरीत अदा करण्यात यावे.
३. सदर ग्राहकास सुरक्षा ठेव रक्कम परत करण्यास झालेल्या विलंबापोटी महावितरण कंपनीचे कृती मानका (SOP) नुसार कार्यवाही करण्यात यावी.
४. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल ), विनियम २००६ मधील विनियम क्र.६.१२ नुसार नोडल अधिकारी यांनी या आदेशाची पूर्ततेचा व आदेशातील दखल पात्र निष्कर्ष यावरील कार्यवाहीचा अहवाल मंचाकडे एक महिन्यात सादर करावा.
५. निर्देशित कालावधीत वितरण कंपनीने या आदेशाची अंमलबजावणी न केल्यास महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल ), विनियम २००६ मधील विनियम क्र.२२ अन्वये तक्रारदार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे दाद मागु शकतात.
६. या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असल्यास, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल), विनियम २००६ मधील नियम क्र.१७.२ नुसार मा. विद्युत लोकपाल यांचेकडे, (द्वारा-महाराष्ट्र वीज नियामक आयोग, ६०६ केशवा बंगला, बांद्रा कॉम्पलेक्स (पुर्व) मुंबई-४०००५१) येथे या आदेशाच्या दिनांकापासुन ६० दिवसाच्या आत ते अपील करु शकतात.

| सही | सही | सही |
|---|---|---|
| **(चंद्रकांत मोहन येशीराव)** | **(विजयानंद संपतराव काळे)** | **(भास्कर गोविंदा पालवे.)** |
| **सदस्य** | **सदस्य-सचिव तथा कार्यकारी अभियंता** | **अध्यक्ष** |

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :-**

१. मुख्य अभियंता,मरा.वि.वि.कं.(मर्या), विद्युत भवन, परिमंड्ळ कार्यालय, जळगाव.
२. अधिक्षक अभियंता, मरा.वि.वि.कं.(मर्या) मंडळ कार्यालय,जळगाव.

**सदस्य-सचिव तथा कार्यकारी अभियंता**
**म. रा. विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच,**
**जळगाव.परिमंडळ, जळगाव**



Scanned by CamScanner